Annex-VII

**मे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडद्वारे, गट नं ३७२, ढवळे रोड, दुधडेअरी रोड, एमआयडीसी जवळ, भीमवाडी, गाव तुप्पा, ता. व जिल्हा नांदेड येथे प्रस्तावित ४४.३४ टन प्रति दिवस क्षमतेचा एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन सुविधा प्रकल्पासंदर्भात पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणी बाबतचा इतिवृतांत.**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडद्वारे, गट नं 372, ढवळे रोड, दुधडेअरी रोड, एमआयडीसी जवळ, भीमवाडी, गाव तुप्पा, ता. व जिल्हा नांदेड येथे प्रस्तावित ४४.३४ टन प्रति दिवस क्षमतेचा एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन सुविधा करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरूवार, दिनांक २७ जुलै , २०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे आयोजित करण्यात आलेली होती.

श्री शंकर सि. केंदुळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नांदेड तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. अभिजीत राऊत, जिल्हादंडाधिकारी, नांदेड तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती व श्री. सुजित ढोलम, प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद तथा सदस्य पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की, भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तक मे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेडद्वारे, गट नं ३७२, ढवळे रोड, दुधडेअरी रोड, एमआयडीसी जवळ, भीमवाडी, गाव तुप्पा, ता. व जिल्हा नांदेड येथे प्रस्तावित ४४.३४ टन प्रति दिवस क्षमतेचा एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन सुविधा करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित सदरील प्रकल्प शेड्युल ७ (१) अंतर्गत, वर्गवारी ब मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की, पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य

जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मुंबई यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १७/०३/२०२३ रोजी सादर केला व त्यास अर्जास महाराष्ट्र शासनाने ऑनलाईन मंजूरी दिनांक २०/०३/२०२३ रोजी प्रदान केली.

मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी प्रत्यक्ष पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरूवार, दिनांक २७ जलै, २०२३ रोजी सकाळी ११. ३० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४५/२०२३, व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी(डब्लुपीसी)/ईनव्ही-पीएच/बी-२३०७०५-एफटीस-००२९ दि ०५/०७/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, नांदेड - अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी
(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - सदस्य
यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद

३) उप प्रादेशिक अधिकारी, - आयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
नांदेड

सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नांदेड यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक मराठी वृत्तपत्र दैनिक सकाळ व इंग्रजी दैनिक वृत्तपत्र टाईम्स ऑफ इंडिया यामध्ये जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दिनांक २३-०६-२०२३ रोजी प्रकाशित केली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते –

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नांदेड,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, नांदेड,

५)	तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, तालुका व जिल्हा नांदेड,

६)	ग्रामपंचायत कार्यालय, मौ. तुप्पा, ता. लोहा, जि. नांदेड

७)	पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.

८)	सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

९)	प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, भूखंड क्रं. अ-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, दैनिक लोकपत्रच्या मागे, सेठ नंदलाल धूत हॉस्पीटल शेजारी, जालना रोड, औरंगाबाद

१०)	उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, २ रा मजला, शिवाजी पुतळया जवळ, वजीराबाद नांदेड - ४३१६०१.

११)	संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई,

उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नांदेड यांनी प्रकल्पाविषयी एकही लेखी सुचना/हरकती/टिप्पणी/तक्रार प्राप्त नसल्याचे नमुद केले आहे.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात, असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की, ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. आपण जनसुनावणीत उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण, वने व हवामान बदल विभाग, महराष्ट्र शासन, मुंबई यांना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाविषयी व पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले. त्यांनी सांगितले की, नांदेडमध्ये सुमारे ३५४.५३ टीपीडी एम एस डब्लू (२०३२ च्या लोकसंख्येनुसार) निर्माण होईल, त्यापैकी ५५.२५% (१९५.८८ टीपीडी) ओला कचरा, २९.०७% (१०३.०६ टीपीडी) सुका कचरा आणि १५.६७% (५५.५९ टीपीडी) होता. सध्या, शहरातून निर्माण होणारा सर्व कचरा ढवळे रोड, दूध डेअरी रोड, एमआयडीसीजवळ, भीमवाडी गाव तुप्पा, शहरी स्थानिक संस्था (ULB) पासून १५ किमी अंतरावर असलेल्या डम्पिंग साइटवर (गट क्र. ३७२) उघड्यावर टाकला जातो. नांदेड-वाघाळा. या जागेचे क्षेत्रफळ ९.८९ हेक्टर आहे. २०१२ पासून ही जागा डंपिंग साइट म्हणून वापरली जात आहे. नांदेडला SWM नियम २०१६ चे पालन करून शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्यावर प्रक्रिया

करून त्याची विल्हेवाट लावण्याच्या संकटाचा सामना करावा लागत आहे. नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका (NWCMC) आता महापालिकेचा कचरा ठेवण्याची योजना आखत आहे. विद्यमान डंपिंग साइटवर प्रक्रिया सुविधा प्रस्तावित इंटिग्रेटेड सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट फॅसिलिटी (ISWMF) मुख्यतः विंड्रो कंपोस्टिंग प्रक्रियेदरम्यान विलगीकरणातून मिळणाऱ्या अक्रिय कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तयार करण्यात आली आहे. सदरहू प्रकल्पासाठी एकूण खर्च २७.८१ कोटी खर्च येणार आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेकडून बायोडिग्रेडेबल कचरा, पुनर्वापर करता येण्याजोगा आणि निष्क्रिय कचरा प्रक्रिया करण्याची सुविधा करण्यात येईल. कचऱ्याच्या जैवविघटनशील सेंद्रिय अंशावर प्रक्रिया करण्यासाठी कंपोस्टिंग तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. पुनर्वापर करण्यायोग्य वस्तूंचे विलगीकरण केले जाईल आणि पुढील प्रक्रियेसाठी पाठवले जाईल तर निष्क्रिय कचरा सॅनिटरी लँडफिल साइटवर टाकला जाईल. प्रकल्पाची योजना अशा प्रकारे करण्यात आली आहे की संसाधन कार्यक्षमता वाढवण्यावर आणि 4R's-कमी करणे, पुनर्वापर करणे, रीसायकल करणे आणि पुनर्प्राप्त करणे याला प्रोत्साहन देणे यावर भर दिला जाईल. महानगरपालिकेचा कचरा लँडफिल साइट्सपर्यंत वळवण्यात आणि शहरातील सध्याच्या कचरा व्यवस्थापन/प्रक्रिया सुविधांवरील भार कमी करण्यात ही सुविधा महत्त्वपूर्ण योगदान देईल.

सदरहू प्रकल्पातुन सुमारे ९१.७८५ घन मीटर/दिन इतके सांडपाणी (लीचेट) निर्मिती होणार असुन ते साठवण्यासाठी अछिद्र टाकीची व्यवस्था करण्यात येणार असुन सदरील सांडपाण्याचा (लीचेट) वापर कंम्पोस्टींगकरीता विंडरोज मध्ये फवारणीसाठी करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पामुधन सुमारे १२ घनमीटर/दिन इतके घरगुती सांडपाणी निर्मिती होणार असुन त्यावर प्रक्रिया करण्याकरीता १५ घनमीटर/दिन क्षमतेचा घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात येत आहे.

सादरीकरणानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक आक्षेप, सूचना असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले.

उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांना दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-

**१. श्री गंगाधर माधवराव झंझारे, राहणार विष्णुपुरी, ता. जि. नांदेड :-**

| अ क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या प्रकल्पामुळे नांदेड शहराला पुर्वीपेक्षा नवीन काय फायदा होईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, सध्याचा जो प्रकल्प आहे तीथे फक्त हा कचरा साठवला जायचा व त्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया केली जात नव्हती, परंतु आता या प्रकल्पामुळे शहरातुन जो कचरा गोळा होणार आहे त्याचे प्रक्रिया करून खत तयार करणार आहोत व |

| | | |
|---|---|---|
| | | तसेच त्यामधुन निघणारा सुका कचरा अधिकृत विक्रेत्याला देणार आहोत. |
| २ | या प्रकल्पाच्या सुरक्षततेसाठी विशेष अधिकारी नेमण्यात येतील का? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, अग्नीशमन यंत्रणेची देखभाल व कामगरांच्या सुरक्षततेसाठी विशेष अधिकारी या प्रकल्पासाठी असणार आहे . |

मा अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकाला सुचना केली की, आपण सीईआर मध्ये नमुद केल्याप्रमाणे आपण आरोग्य जागृती आणी वैद्यकिय शिबीर घेणार आहात परंतु शासन स्तरावर बऱ्याच प्रमाणात आरोग्य जागृती आणी वैद्यकिय शिबीर घेत असते त्यामुळे एकदा आरोग्य शिबीर घेऊन त्याचा काही फायदा होणार नाही त्यापेक्षा त्या गावामधील वैद्याकिय उपकेंद्र किंवा प्राथमीक आरोग्य केंद्राला भांडवली किंवा लागणारे उपकरण द्यावेत जेणेकरून त्याचा फायदा तेथील गावातील गावकऱ्यांना भविष्यात घेता येईल व तसेच सीईआर मध्ये वृक्षारोपन व जलसंधारणासाठी तरतुद करण्यात यावी.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, आपण केलेल्या सुचनेप्रमाणे वृक्षारोपण व जलसंधारणासाठीची तरतुद सीईआर मध्ये समाविष्ट करण्यास सहमती आहे.

**२. श्री मारोती पानपट्टे, राहणार सिडको, तालुका व जि. नांदेड :-**

| अ क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | शहरातील कचरा गोळा करतेवेळेस तो कसा गोळा केला जाईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, शहरातील कचरा रोजच्यारोज घंटागाडीद्वारे गोळा केला जाणार आहे व काही ठिकाणी मोठ्या आकाराच्या कचरा कुंड्या बसवणार असुन दररोज घेऊन जाण्याची व्यवस्था केली जाणार आहे. |

**३. श्री ज्ञानेश्वर गोविंदराव टेकाळे, राहणार कैलासनगर, ता. जि. नांदेड**

| अ क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पासाठी किती कर्मचारी लागणार आहेत आणि त्यांची निवड कशी करणार आहात व त्यांना भविष्यात काय फायदा होईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, प्रकल्पासाठी ८० कर्मचाऱ्यांची गरज लागणार आहे व त्यांची निवड प्रक्रिया ही महानगरपालिकेच्या नियमांप्रमाणे व शैक्षणिक गुणवत्तेणुसार होणार असुन त्यामुळे त्यांची अर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. |

४. श्री मोहम्मद फैजान राहणार, देगलुर नाका, ता. जि. नांदेड

| अ क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | पावसाळ्याच्या दिवसात साठवलेला कचरा ओला होणार असुन त्यामधील निघणाऱ्या पाण्यावर काय उपाययोजना करणार आहात? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, प्रकल्पातुन निर्माण होणारे सांडपाणी (लीचेट) हे अंतर्गत पाईपलाईनद्वारे सांडपाणी (लीचेट) टाकीमध्ये साठवणार असुन सदरील सांडपाण्याचा (लीचेट) वापर कंम्पोस्टींगकरीता विंडरोजमध्ये फवारणीसाठी करण्यात येणार आहे. तसेच प्रकल्पामधुन निघणाऱ्या घरगुती सांडपाण्यावर प्रक्रिया करणेसाठी घरगुती सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्यात येणार आहे. |

५. श्री, सिताकांत नरहर पांडे राहणार लोकमित्र नगर, पुर्णा रोड ता. जि. नांदेड

| अ क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | कचऱ्यातुन जे खत तयार होणार आहे ते शेतकऱ्यांसाठी देणार किंवा कसे? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, तयार खत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू जेणेकरून रासायनीक खतांऐवजी सेंद्रीय खतांचा वापर करता येईल. |

६. श्री, करण वामनराव इंगोले रा. बळीरामपुर, ता. जि. नांदेड

| अ क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सुक्या कचऱ्याचे काय केले जाईल? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, सुक्या कचऱ्याचे विलगीकरण करून त्यामधुन निघणारे धातु, प्लास्टीक, पेपर हे वेगळे करून अधिकृत पुनर्रप्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना देण्यात येईल. |

७. श्री, हनमंत सखाराम शेळके रा. तुप्पा, ता. जि. नांदेड

| अ क्रं | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्प कधी चालु होणार आहे? | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, सदर प्रकल्पाला पर्यावरणीय मंजुरी मिळाल्यानंतर लवकरात लवकर प्रकल्प सुरू करण्याचा प्रयत्न राहील. |

समिती सदस्य यांनी महानगपालिकेच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली की, सद्य स्थितीत पर्यावरणीय आघात मुल्यांकन (ईआयए) मध्ये सादर केल्याप्रमाणे त्यामध्ये २०१२ पासुन तिथे कचरा साठवल्या जात आहे असे नमुद केले आहे तसेच सदर कचरा हा अशास्त्रोक्त पध्दतीने साठवलेला आहे व तिथे जो जुना कचरा (लिगसी वेस्ट) जमा आहे तो किती प्रमाणात आहे आणि त्यावर काय उपाययोजना करणार आहेत?

महानगरपालिकेच्या प्रतिनीधी यांनी माहिती दिली की, सद्यस्थितीत त्या जागेवर जुना कचरा हा ७.१४ लाख घनमीटर ऐवढा आहे. सदर कचऱ्यावर बायोमायनिंग करण्याचे काम दोन महिन्यापासुन चालु आहे.

तसेच पुढे त्यांनी सुचना केली की, पर्यावरण आघात मुल्यांकनामध्ये समाविष्ट असलेल्या भुजल नमुन्यांच्या अहवालाचे अवलोकन केले असता क्लोराईड, टीडीस आणि कॉलीफॉर्मचे प्रमाण मार्यादेपेक्षा जास्त असल्याचे आढळुन येते त्याची फेर तपासणी करून सदर अहवाल पर्यावरण आघात मुल्यांकनामध्ये (ईआयए) समाविष्ट करण्यात यावा.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की, आपण केलेल्या सुचनेचे पर्यावरण आघात मुल्यांकन (ईआयए) मध्ये समाविष्ट करून घेऊ.

मा. अध्यक्ष तथा जिल्हाधीकारी, पर्यावरण लोकसुनावणी समिती यांनी समारोप प्रसंगी आपल्या अभिप्रायात असे नमुद केले की, लोकसुनवणीच्या वेळी उपस्थित केलेले सर्व मुद्दे जसेच्या तसे लोकसुनाणीच्या इतीवृत्तांतामध्ये समाविष्ट करून पुढील योग्य त्या कार्यवाही करीता सदरचा अहवाल पर्यावरण मंत्रालय, महाराष्ट्र शासनाला सादर करण्यात येईल.

त्यांनतर आभार प्रदर्शन होऊन लोकसुनावणी पुर्ण झाल्याचे घोषित केले.

**(शं. सि. केंदुळे)**
समन्वयक लोकसुनावणी समिती
तथा उप प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, नांदेड

**(सुजीत ढोलम)**
सदस्य लोकसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
म. प्र.नि. मंडळ, औरंगाबाद

**(श्री अभीजीत राऊत)**
अध्यक्ष, लोकसुनावणी समिती
तथा अतिरीक्त जिल्हाधिकारी, नांदेड.